ePaper
**बीडमध्ये मोठ्या हालचाली, संतोष देशमुखांचे भाऊ मोबाईल टॉवरवर चढून करणार आंदोलन**

वर्ष - 8 । अंक -184 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 13 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- रोहित मेलबर्ननंतर घेणार होता निवृत्ती
- जेमिमाने सात वर्षांनी झळकावलं शतक
- मुलीला साध्वी होण्यासाठी दान
- प्रवासासाठी केंद्राचा मोठा निर्णय!

## ‘ग्लोबल एंटरप्रेन्युअर्स कॉन्क्लेव्ह’

# मराठी उद्योजकतेला चालना!

### नितीन गडकरी यांचे प्रतिपादन: पीसीईटी, पीसीयू, गर्जे मराठी ग्लोबल, एमईडीसीच्या परिषदेचे उद्घाटन

। पुणे । महाईन्यूज

**अमेरिकेसारख्या विकसित राष्ट्रांमध्ये मराठी उद्योजक मोठ्या पदांवर जबाबदारी सांभाळत आहेत. महाराष्ट्रात नैसर्गिक साधन संपत्ती मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. महाराष्ट्र बरोबरच देशभर उद्योग, व्यवसाय आणि रोजगाराला चालना देण्यासाठी सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था आणि उद्योजक यांच्यामध्ये योग्य समन्वय, संपर्क होणे आवश्यक आहे. त्यासाठी पीसीईटी, पीसीयू, गर्जे मराठी ग्लोबल आणि एमईडीसी यांनी स्थापन केलेले ‘ग्लोबल एंटरप्रेन्युअर्स कॉन्क्लेव्ह २०२५’ हे व्यासपीठ मार्गदर्शक ठरेल. या व्यासपीठामुळे महाराष्ट्र सह जगभरातील मराठी उद्योजकतेला चालना मिळेल असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.**






पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचलित पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयु), गर्जे मराठी ग्लोबल, महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने, बालेवाडी येथे ‘ग्लोबल एंटरप्रेन्युअर्स कॉन्क्लेव्ह २०२५’ चे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन नितीन गडकरी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले.

यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, माजी मंत्री व पीसीयूचे कुलगुरू हर्षवर्धन पाटील, जीआरएचे अध्यक्ष आणि नॅशनल इनोव्हेशन फाऊंडेशन, इंडियाचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर, स्ट्रॅटेजिक फोरसाइट ग्रुपचे अध्यक्ष आणि ए वर्ल्ड विदाऊट वॉरचे लेखक संदीप वासलेकर, डॉ. समीर मित्रगोत्री, हार्वर्ड विद्यापीठाचे प्रा. डॉ. नील फिलिप, ब्रॉन्क्स कम्युनिटी कॉलेज न्यूयॉर्कच्या सिटी युनिव्हर्सिटीचे प्रा. डॉ. मुकुंद कर्वे, रटगर्स विद्यापीठ यूएसएचे प्रा. आणि डॉ. शैलेंद्र देवळाणकर, पीसीईटीच्या उपाध्यक्ष पद्माताई भोसले खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई तसेच महाराष्ट्र शासनाचे उच्च शिक्षण संचालक, उद्योग मंत्रालयाचे उच्चपदस्थ अधिकारी, देश, परदेशातून आलेले मराठी उद्योजक उपस्थित होते.

या परिषदेसाठी शंभर पेक्षा जास्त एनआरआय मराठी उद्योजक, वक्ते, संशोधक, शास्त्रज्ञ, १२० स्टार्टअपचे नवउद्योजक, गुंतवणूकदार अशा बाराशे पेक्षा जास्त व्यक्तींनी सहभाग घेतला होता.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वागत सचिन ईटकर, आभार आनंद गानु यांनी मानले.

## रामदास काकडे यांच्यासह मान्यवरांचा सन्मान...

यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते उद्योजक रामदास काकडे, डॉ. पी. डी. पाटील आणि सुरेश पुराणिक यांना जीवनगौरव तसेच आशिष आचलेकर, अमित गर्ग, डॉ. एस. व्ही. आंचन, रमेश रासकर, महेश भागवत, विलास शिंदे यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## उद्योग मंत्रालयात स्वतंत्र विभाग...

उद्योग मंत्री उदय सामंत उद्घाटन सत्रात मार्गदर्शन करताना म्हणाले की, महाराष्ट्र बरोबरच देश परदेशातील मराठी उद्योजकांना उद्योग व्यवसाय मध्ये मदत होण्यासाठी महाराष्ट्र उद्योग मंत्रालयाच्या वतीने एक स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात येणार आहे. आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयात मराठी भाषेत अभियांत्रिकीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. याचा आगामी काळात मराठी अभियंते मोठ्या प्रमाणात घडण्यास उपयोग होईल.

## शिक्षण संस्था, उद्योजकांमध्ये दुवा...

माजी मंत्री व पीसीयूचे कुलगुरू हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले की, शैक्षणिक संस्था व विविध उद्योग यांच्यातील यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी हे व्यासपीठ सुरू करण्यात आले आहे. यामध्ये उद्योजक, विद्यार्थी व उद्योग विभागाचे धोरण ठरवणारे अधिकारी यांना एकत्र आणून यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न पीसीयूच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

# गृहमंत्री नव्हे तर कोण जबाबदार?

## राज्यात पाच ते सहा राजकीय पक्षांची दुकाने उघडली आहेत : चव्हाण

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य उद्योगस्नेही होण्याऐवजी अनेक उद्योग अन्य देशात जात आहेत. या परिस्थितीमध्ये मराठवाड्या सारख्या भागात औद्योगिक गुंतवणूक येत असताना उद्योगांकडे खंडणी मागण्याचे प्रकार घडत आहे. या खंडणी मागणऱ्या यंत्रणेला राजकीय आश्रय मिळत आहे. या परिस्थितीत मुख्यमंत्र्यांनी खंडणीच्या प्रकाराला वेसण घातील नाही तर, नवीन उद्योग कसे येणार? खंडणीच्या प्रकारांना मुख्यमंत्री, गृहमंत्री जबाबदार नसतील तर कोण आहे ? अशी विचारणा राज्याचे माजी मुख्यमंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी येथे केली.**



महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने 'गांधी दर्शन शिबिराचे' आयोजन रविवारी करण्यात आले. त्याअंतर्गत 'सध्याची राजकीय परिस्थिती' या विषयावर बोलताना पृथ्वीराज चव्हाण यांनी राज्यातील राजकीय पक्षांची अवस्था, पक्षांतर बंदी कायदा, निवडणूक आयुक्त बदलाचा कायद्याबाबत सडेतोड भाष्य केले. राजकीय विचारांची लढाई राज्यात दिसत नाही. त्यामुळे सध्याच्या राजकीय व्यवस्थेतून नागरिकांचे प्रश्न सुटतील का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. युवक क्रांती दलाचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यावेळई उपस्थित होते. मानवाधिकार कार्यकर्ते आनंद तेलतुंबडे, प्रा. नितीश नवसागरे यांनी अनुक्रमे गांधी, आंबेडकर आणि संविधान तसेच एक देश एक निवडणूक या विषयावर मार्गदर्शन केले.'कोणत्याच राजकीय पक्षात पक्षांतर्गत लोकशाही दिसत नाही. राज्यात पाच ते सहा राजकीय पक्षांची दुकाने उघडली आहेत. त्यांना इकडे काही मिळाले नाही की ते दुसरीकडे जातात. लोकांनाही त्याचे काही वाटत नाही. पक्षांतरबंदी कायदा कागदावरच राहिला आहे. राज्यात दोन वर्षे बेकायदा सरकार होते. पक्षांतरबंदी नुसार त्यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होऊन निर्णय होणे अपेक्षित होते. मात्र निकालावर सुनावणी न घेता तत्कालीन सरन्यायाधिशांनी लोकशाहीच्या हत्येलाच एक प्रकारे मदत केली. यानिमित्ताने विधीमंडळाचा न्यायपालिकांवर अंकुश आहे का हा प्रश्नही पुढे येत आहे,' असे चव्हाण यांनी सांगितले. सध्या अनेक नेते गुडघ्याला बाशिंग बांधून मंत्रिपदाची शपथ घ्यायला तयार होत आहेत. विकासकामांना पैसा कोठून आणणार, विरोधात राहिलो तर, पाच वर्षे काय करणार, पुन्हा निवडून कसे येणार असे प्रश्न त्यांच्यापुढे आहेत. त्यातून निवडणूक खर्च काढण्याचे प्रकार होत आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक नेत्यांच्या संस्था अडचणीत आहेत. या परिस्थितीत बरोबर या अन्यथा त्रास होईल, असे सांगून विरोधी पक्ष संपविण्याचा डाव आहे. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा हे वर्तुळ तोडणे अवघड झालेआहे. राजकीय अस्थिरता आणि भ्रष्टाचार केल्याशिवाय निवडणुकीला सामोरे जाता येत नाही, अशी परिस्थिती निर्माण करण्यात आली आहे, असेही चव्हाण यांनी स्पष्ट केले.'विकसित भारता'चा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उद्योगपतींचा दावा हस्यास्पद आहे. देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलरपर्यंत असली तरी दरडोई उत्पन्नात देश १४० व्या क्रमांकावर आहे. अनेक छोटी राष्ट्र भारतापुढे आहेत. वार्षिक सहा टक्के विकासदराने देशाचा विकास होणार नाही.

### विकासाचे दावे हस्यास्पद

आरोग्य आणि शिक्षणाच्या क्षेत्रात दयनीय परिस्थिती आहे.राज्य घटना ही विचार समूह आहे. अशी घटना पुन्हा लिहिली जाणार नाही. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत:ला महामानव समजत नव्हते. सध्याच्या प्रश्नांवर विचार करताना मार्क्सवाद, गांधीवाद आणि आंबेडकर समजूत घेतले पाहिजेत. गांधी-आंबेडकर यांच्या मतभेद असले तरी दुराभाव नव्हता, असे आनंद तेलतुंबडे यांनी सांगितले.महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने 'गांधी दर्शन शिबिराचे' आयोजन रविवारी करण्यात आले. त्याअंतर्गत 'सध्याची राजकीय परिस्थिती' या विषयावर बोलताना पृथ्वीराज चव्हाण यांनी राज्यातील राजकीय पक्षांची अवस्था, पक्षांतर बंदी कायदा, निवडणूक आयुक्त बदलाचा कायद्याबाबत सडेतोड भाष्य केले. राजकीय विचारांची लढाई राज्यात दिसत नाही. त्यामुळे सध्याच्या राजकीय व्यवस्थेतून नागरिकांचे प्रश्न सुटतील का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

---

# पुण्याची ओळख लवकरच 'इलेक्ट्रॉनिक क्लस्टर

## कंपन्या आकर्षित होऊन पुण्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**येत्या काळात पुणे 'इलेक्ट्रॉनिक क्लस्टर' म्हणून नावारूपास येणार असून उद्योजक, कंपन्या पुण्यात आकर्षित होऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या 'सेमीकंडक्टर मिशन' अंतर्गत रांजणगाव येथे प्रस्तावित इलेक्ट्रॉनिक उत्पादन संकुलाचे (मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर) काम येत्या दीड वर्षात पूर्ण होणार असल्याची माहिती केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी शनिवारी दिली.**



'स्टोरियन एचके' आणि 'आयएफबी' या दोन मोठ्या कंपन्यांकडून या संकुलाची उभारणी सुरू असून येत्या काळात ५०० कोटी रुपयांचा निधी यासाठी देण्यात येईल. सेमीकंडक्टरशी निगडित विविध प्रश्न सोडवण्यासाठी मदत होईल. शिवाय देशातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन वाढेल. या परिसरातील उत्पादक कंपन्यांनाही या संकुलाचा फायदा होईल,' असे वैष्णव यांनी स्पष्ट केले. पुण्यातील 'सी-डॅक संस्थेला भेट दिल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी वैष्णव म्हणाले, 'भारत विकसित देश होण्यासाठी २०४७ पर्यंत होईल. त्या अनुषंगाने संगणकीय आणि तंत्रज्ञानाचा विकास हा मुख्य पाया असून 'सी-डॅक'ची त्यात अतिशय महत्त्वाची भूमिका आहे. 'आयआयटी मद्रास', बेंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्था (आयआयएस्सी),'आयआयटी गांधीनगर' या शैक्षणिक संस्थांमध्ये सेमीकंडक्टर आणि संगणकीय क्षेत्रातील संशोधन कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. या सर्व संशोधन कार्याला एकाच छताखाली आणून पुढे मार्गक्रमण करण्यासाठी एकसंध आणि सुसंगत मार्ग कसा तयार करता येईल, यावर आढावा बैठकीत चर्चा करण्यात झाली आहे. जवळपास २४० संस्थांमध्ये चिप्स डिझाइन करण्यासाठी आवश्यक प्रगत उपकरणे उपलब्ध असल्याचे वैष्णव यांनी सांगितले.

### पुण्यातील 'सी-डॅक संस्थेला भेट

'स्टोरियन एचके' आणि 'आयएफबी' या दोन मोठ्या कंपन्यांकडून या संकुलाची उभारणी सुरू असून येत्या काळात ५०० कोटी रुपयांचा निधी यासाठी देण्यात येईल. सेमीकंडक्टरशी निगडित विविध प्रश्न सोडवण्यासाठी मदत होईल. शिवाय देशातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन वाढेल. या परिसरातील उत्पादक कंपन्यांनाही या संकुलाचा फायदा होईल,' असे वैष्णव यांनी स्पष्ट केले.पुण्यातील 'सी-डॅक संस्थेला भेट दिल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी वैष्णव म्हणाले, 'भारत विकसित देश होण्यासाठी २०४७ पर्यंत होईल.

## अमोल कोल्हे हवेवर निवडून येणारे खासदार

# खासदार कोल्हे यांना ठाकरी शैलीत जोडे!

## अंबादास दानवे यांनी खासदार कोल्हे यांच्या वक्तव्याची हवा काढली

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**संघटनेत २०-३० वर्षे झिजावे लागते हे खासदार अमोल कोल्हे यांना माहित नाही."अमोल कोल्हे हे हवेवर निवडून येणारे खासदार आहेत. अशा शब्दात विधान परिषदेचे. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे ज्यांनी ठाकरे शैलीमध्ये कोल्हे यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला..**





अमोल कोल्हे यांनी नुकतेच एका कार्यक्रमात काँग्रेस आणि शिवसेनेवर वक्तव्य केले होते, "विधानसभा निवडणुकीतील पराभवामुळे काँग्रेसची मोडलेली पाठ अद्याप सरळ व्हायला तयार नाही, तर, दुसऱ्या बाजूला शिवसेना (ठाकरे) अजूनही झोपेतून जागी झालेली नाही. राज्यात मित्र पक्षांच्या अशा वागण्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या आपल्या पक्षाला विरोधी पक्ष म्हणून वाढण्यासाठी मोठी जागा व संधी आहे. खरंतर, पराभव हा आधी मनात होतो आणि त्यानंतर रणांगणात होतो, त्यामुळे मरगळ झटका आणि कामाला लागा. तुमच्याकडे लढणारे शरद पवार आहेत".

कोल्हे यांच्या या वक्तव्यानंतर काँग्रेस नेत्यांनी व शिवसेनेच्या (ठाकरे) नेत्यांनी त्यांच्यावर पलटवार केला आहे.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले, "अमोल कोल्हे हे हवेवर निवडून येणारे खासदार आहेत. संघटनेत २०-३० वर्षे झिजावं लागतं ते त्यांना माहित नाही. मविआबद्दल त्यांनी त्यांचं मत व्यक्त केलं आहे. एखादा परभव आणि विजय या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आघाडीत बिघाडी कुठेही नाही. निवडणूक आली की विजय पराजय होतो. माविआ फुटणार नाही.

### खासदार कोल्हे यांच्या वक्तव्याचा समाचार..

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राने महाविकास आघाडीची एकजूट व ताकद पाहिली. मात्र महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचं पानिपत झालं. त्यानंतर आता मविआमध्ये धुसफूस चालू असल्याचं पाहायला मिळत आहे. मविआमधील सर्वच पक्ष व त्यांचे नेते आता एकमेकांवर टीका करत आहेत. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत स्वबळाचा नारा देत आहेत. "लोकसभेनंतर आम्ही मुख्यमंत्रिपदासाठी वाद घातले, एकमेकांवर कुरघोड्या केल्या", असं म्हणत काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी मविआला घरचा आहेर दिला आहे. तर, शिवसेनेचे (ठाकरे) राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आम्ही स्वबळावर लढू शकतो असं म्हटलं आहे. त्यानंतर राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी मविआतील मित्रपक्षांना टोला लगावला. मात्र यामुळे खासदार कोल्हे चांगलेच अडचणीत आले आहेत. काँग्रेस आणि शिवसेनेकडून कोल्हे यांच्यावर पलटवार होत असून दानवे यांनी खास ठाकरे शैलीमध्ये कोल्हे यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला आहे.

---

## ज्ञान प्रबोधिनी पालक संघातर्फे 'वॉकेथोन'

### सुमारे 1500 पालकांची एकत्र चाल : कुटुंब संस्कृती अन् आरोग्याचा संदेश

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्ञान प्रबोधिनीच्या पालक महासंघाने कुटुंब संस्कृती आणि कुटुंबाचे आरोग्य या विषयासाठी 'वॉकेथोन'चे आयोजन केले होते. स्वामी विवेकानंद जयंतीच्यानिमित्ताने पालकांनी एकत्र येऊन कुटुंब संस्कृतीचा आगळा वेगळा महोत्सव साजरा केला. वय वर्षे २ ते वय वर्षे ९० अशा सर्व वयोगटातील सदस्य यामध्ये सहभागी झाले होते. १ किमी, ३ किमी, ६ किमी अशा तीन गटात हे सदस्य सहभागी झाले होते.**






विद्यमान विधानपरिषद आमदार अमित गोरखे, एव्हरेस्ट वीर सागर पालकर, एव्हरेस्ट वीर शरद कुलकर्णी, उद्योजक प्रसाद कुलकर्णी, युवा नेते जयदीप खापरे यांनी या उपक्रमाचे उद्घाटन केले. याप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या विद्या उदास यांनी सर्वांचा झुंबा व्यायाम घेत वातावरण चैतन्यमय केले.

पालक संघ मार्गदर्शक आदित्य शिंदे यांनी सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर पालक, युवक आणि युवतींच्या गटाने हे वीर विवेकानंद हे गीत सादर केले. पालक महासंघाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

### कुटुंब संस्कृती जपण्याचे आवाहन...

आमदार अमित गोरखे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. ज्ञान प्रबोधिनी ही या परिसराची मातृत्व असलेली संस्था असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. केंद्र प्रमुख मनोज देवळेकर यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या आणि कुटुंब संस्कृती जपण्याचे आवाहन केले.

# पैसा झाला खोटा, बांबू बसला मोठा !



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**मुंबई आणि मुंबई परिसरातील ठाणे, कल्याण वगैरे परिसरात जो प्रचंड आर्थिक फटका नागरिकांना बसला आहे, तो संपूर्ण व्यवहार चिंताजनकच म्हणावा लागेल. एखादी उपटसुंभ कंपनी अचानक उगवते... दागिने किंवा पैशाच्या रूपाने नागरिकांना लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवते..किंबहुना, काही महिने तो लाभ सुद्धा देते..आणि विश्वास संपादन करून कोट्यवधी रुपयांचा गंडा घालून पोबारा करते, हे चित्र सूज्ञ आणि सुशिक्षित महाराष्ट्राला नक्कीच शोभा देणारे नाही.**

झटपट श्रीमंत होण्यासाठी सर्वसामान्य नागरिकाची जी धडपड सुरू असते, त्यातूनच असे प्रकार घडत असतात..मनी सर्क्युलेशनच्या योजना असोत, चीट फंडाचे प्रकार असोत, किंवा सदस्य बनवून त्यांना मोठ-मोठी बक्षिसे देण्याचे प्रकार असोत.. सुरुवातीला 'ऑल इज वेल' असते आणि पाच सहा महिन्यानंतर संयोजक गंडा घालून पळून गेलेले असतात हे लक्षात येते..
दुर्दैवाची गोष्ट, म्हणजे असे प्रकार वर्षानुवर्षे चालत आहेत, पण जनतेचे डोळे काही उघडत नाहीत.. झटपट श्रीमंती आणि सहजपणे मिळणारे पैसे, यामागे समाज धावत सुटतो, हे साधे समीकरण समोर ठेवून ही मंडळी या ना त्या स्वरूपात एखादी स्कीम काढून सावज हेरण्यात पटाईत असतात.. आणि त्यांनी लावलेल्या सापळ्यात सर्वसामान्य घरातील 'सावजे' अलगद जाऊन फसतात.. हे वर्षानुवर्षे घडत आहे, आत्ताही घडले आहे आणि काही वर्षांनंतर पुन्हा घडणार आहे !

### हजार कोटी पेक्षा मोठा गंडा, गंडणारे लाखावर!

मुंबईमधील दादर परिसरातील शिवाजी मंदिर भागात 'टोरेस' नावाच्या कंपनीने केलेला असाच एक मोठा घोटाळा नुकताच चव्हाट्यावर आला आहे. या जबरदस्त आर्थिक घोटाळ्यानं गोरगरीब,सर्वसामान्य, मध्यमवर्गीय नागरिकांच्या तोंडचं पाणी पळालं आहे. या कंपनीनं एवढी अफलातून कल्पना काढली होती, की दर आठवड्याला ११ टक्के व्याज दर परतावा देण्याचं आमिष दाखवून ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करून घेतली. आधी सोने, हिऱ्याचे दागिने विकण्यापासून सुरुवात केलेल्या या कंपनीने गुंतवणुकीच्या माध्यमातून बक्कळ पैसा उभा केला.
सुरुवातीला त्यांनी ठरवल्याप्रमाणं आठवड्याला व्याजदर परतावा दिला गेला. त्यातून लाखो गुंतवणूकदारांचा अपेक्षेप्रमाणं विश्वास संपादन केला, पण, ( ठरल्याप्रमाणं ) अचानक या कंपनीच्या सर्व शाखांना टाळे लागल्याचं बघून गुंतवणूकदारांचे धाबे दणाणले. या कंपनीच्या शाखांच्या बाहेर फसवल्या गेलेल्या ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. 'टोरेस'च्या नावाखाली मुंबई, ठाणे व आसपासच्या भागात ज्या शाखा सुरू करण्यात आल्या होत्या, त्यातील जवळपास सव्वालाख ग्राहकांची फसवणूक झाल्याची बाब पोलीस तपासातून पुढे येत आहे. फसल्या गेलेल्या ग्राहकांचा हा आकडा पाच लाखापेक्षा मोठा असल्याचंही काहीजण सांगतात. आपल्या लक्षात आलं असेलच की




'टोरेस' कंपनीच्या नावावर ग्राहकांची फसवणूक करणारा फंडा हा काही नवा प्रकार नाही. मुंबईत दोन महिन्यात पैसे दुप्पट करून देतो, असे सांगणाऱ्या अनेक खासगी कंपनीचा वन टू फॉरचा प्रकार गेल्या १५ ते २० वर्षांत मुंबईकरानी अनुभवला आहे. पण, त्यातून काहीही शहाणपण घेताना कोणी दिसत नाही, म्हणूनच असे प्रकार घडत असावेत. फसल्यानंतर मात्र सरकार आणि पोलीस यंत्रणेवर खापर फोडणाऱ्यांची संख्या प्रचंड असते, हे मुद्दाम सांगावसं वाटतं. 'टोरेस' कंपनीनं कसं गंडवलं आणि पैशासकट पोबारा केला ते एकदा लक्षपूर्वक पाहा. दोन वर्षांपूर्वी म्हणजे २०२३ मध्ये 'प्लेटिनम हरेन प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीनं 'टोरेस' ब्रँड अंतर्गत व्यवसायाला ( सॉरी, धंद्याला ) सुरुवात केली. दादरमध्ये ३० हजार चौरस फुटांचं भव्य ऑफिस सुरू केलं. त्यानंतर दादरसह ग्रँट रोड, नवी मुंबई, कल्याण आणि मीरा रोड या भागात शोरूम सुरू केले.
आणखी एक गंमतशीर बाब म्हणजे कंपनीनं ग्राहकांना भुरळ घालण्यासाठी ठिकठिकाणी सेमिनार्स पण घेतले, त्यात सोने, चांदी आणि हिरे स्टोनवर गुंतवणूक केल्यास तुम्हाला दुप्पट रिटर्न मिळेल. एवढंच नाही, तर एका आठवड्याला पैसे मिळण्याचे वचनही देण्यात आले. गेल्या वर्षभरापासून मुंबईतील अनेक भागात याच योजनेच्या माध्यमातून डिसेंबरपर्यंत कंपनीने नियमित पैसे ग्राहकांना परत दिले होते.( हे पण आधी ठरलेलं असतं )

### सहा लाखवाल्यांना मोठा परतावा

तर या 'टोरेस' कंपनीत गुंतवणूक करणाऱ्यांना केवळ चार हजार रुपयांपासून गुंतवणूक करता येत होती. ही कंपनी रविवारी पैसे गुंतवल्यास सोमवार ते शुक्रवार दरम्यान त्याचा परतावा देत असे. सहा लाखांपर्यंतच्या गुंतवणुकीवर कंपनीकडून सहा टक्के व्याज देत होती. तर सहा लाखांपेक्षा जास्त गुंतवणूक केल्यास गुंतवणूकदारांना ११ टक्के व्याज मिळत होते. अनेकांना ते प्रामाणिकपणे मिळाले देखील! सुरुवातीला या कंपनीने उच्चभ्रू इमारतीत घरे, गाड्या आणि दागिने असा आकर्षक परतावा काही ग्राहकांना दिला. ( हे गुंतवणूकदारांचा विश्वास बसण्यासाठी करावं लागतं ) मुंबईत गुंतवणुकीवर घसघशीत परतावे देणाऱ्या टोरेसच्या बिझनेस मॉडेलची सातत्याने चर्चा होत होती. यानंतर अनेकांनी डोळे झाकून लाखो रुपये टोरेस कंपनीत गुंतवले, मात्र,( टार्गेट पूर्ण झाल्यानंतर ठरल्याप्रमाणे ) कंपनीने आपला गाशा गुंडाळला आहे. हे सगळं ठरलेलं असतं तरी आपली भोळी भाबडी माणसं पुन्हा पुन्हा फसतात, हे दुर्दैव म्हणायचं का मूर्खपणा हेच कळत नाही ! थोडं या प्रकरणात डोकावलं, तर दादर शाखेतील गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी शिवाजी पार्क पोलिसांनी कंपनीच्या पाच अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्यात सुमारे १३ कोटी ४८ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. एकूण सगळ्या बंद शाखेतील ग्राहकांनी पोलीस ठाण्यात तक्रारी करण्यास सुरू केली आहे. 'टोरेस ज्वेलरी' या नावाखाली आतापर्यंत तब्बल सव्वालाख लोकांची एक हजार कोटीची फसवणूक झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.पोलिसानी या प्रकारात कंपनीच्या तीन वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना अटक केली असली, तरी कंपनीच्या दोन संस्थापकानी विदेशात पलायन केले असून ते दोघे युक्रेनचे नागरिक आहेत. यातील काही जण रशिया, किंवा अझरबेजान येथील नागरिक असल्याचेही समजते. (आंधळ्या प्रमाणे पैसे गुंतवणारांच्या लक्षात असल्या गोष्टी कधीच येत नाहीत.)

### काहींची दागिने, घर विकून गुंतवणूक

आता या परिस्थितीत पैसे मिळणे सोडाच; परंतु आकर्षक व्याजाच्या आमिषापायी अनेक कुटुंबावर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. कंपनीवर विश्वास ठेवून दुप्पट रिटर्नच्या अपेक्षेने कुटुंबाचे दागिने गहाण ठेवून गुंतवणूक केली, काही जणांनी प्रसंगी घर विकून गुंतवणूक केली. पण, आता दागिने गायब झाले, अशी एका गुंतवणूकदाराची प्रतिक्रिया आहे.
दादर येथील भाजी विक्रेते प्रदीपकुमार वैश्य यांनी साडेचार कोटी रुपयांची गुंतवणूक या कंपनीत केली होती. वैश्यच्या दुकानासमोरच 'टोरेस' चे आलिशान कार्यालय होते. सुरुवातीला एक लाख रुपयाच्या गुंतवणुकीवर आठवड्यात व्याज मिळाल्यानंतर त्याने कुटुंबीयांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले, अवघ्या सात महिन्यांत वैश्य यांनी सर्वाधिक साडेचार कोटी गुंतवले, त्यांच्या तक्रारीवरून शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पण,हाय रे दैवा म्हणत त्यांना हात चोळत बसावे लागणार आहे.
आता, थोडा पुढील विचार करू. काही दिवसात पोलीस आरोपीना पकडतील, काही महिन्यानंतर प्रकरण शांत झाल्यावर आरोपींना जामीन मिळेल, मात्र, गुंतवणूकदारांना धामाची मूळ रक्कम पुन्हा मिळविण्यासाठी कोर्टाच्या आदेशाची प्रतीक्षा करावी लागणार आहे. कोर्टाचे निर्देश असे असतात की तुमच्या हाती काहीही लागत नाही. हे पुन्हा पुन्हा सांगण्याची वेळ येते. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे, अशा आर्थिक घोटाळ्याला जसे लोभी गुंतवणूकदार जबाबदार आहेत, हे आपण मान्य करायला हरकत नाही. परंतु असे घोटाळे रोखण्यासाठी पोलीस प्रशासनापासून शासकीय यंत्रणा सुस्त आहेत, याचा विचारही केला जावा. बँकांनीही किती व्याजदर द्यावे, याचे निकष रिझर्व्ह बँक ठरवते. त्यामुळे आठवड्याला, महिन्याला व्याजदर देणारी कंपनी आपल्या परिसरात कार्यरत असेल तर स्थानिक पोलिसांनी त्याकडे लक्ष द्यायला नको का? आता 'टोरेस' कंपनीच्या गुंतवणूकदारांवर पश्चात्तापाची वेळ आली आहे. आम्हाला व्याज नको. पण आम्ही गुंतवलेले पैसे तेवढे परत करा, या मागणीसाठी त्याचा आता संघर्ष सुरू झाला आहे. एकूणच गुंतवणूकदारांची परिस्थिती 'तेलही गेले, तूपही गेले, हाती राहिले धुपाटणे!' अशी झाली आहे. याला जबाबदार कोण याचा विचार केलेला बरा ! एखाद्या गुहेमध्ये दबा धरून बसलेल्या सिंहाच्या तावडीत एखादं सावज सापडावं, अशीच ही परिस्थिती आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# माझा पतंग कुणीही कापलेला नाही!

## भुजबळ यांचे लाडकी बहीण योजनेबाबत मोठं भाष्य

**।मुंबई।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज।**

**विधानसभेच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्रात महायुतीचं सरकार स्थापन झालं. मात्र, महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात अनेक दिग्गज नेत्यांना संधी देण्यात आलेली नाही. मंत्रिपद न मिळाल्यामुळे महायुतीमधील अनेकांनी नाराजी व्यक्त केली होती. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ यांचाही समावेश आहे. छगन भुजबळ यांनी तर जाहीर नाराजी बोलून दाखवत वेगळी भूमिका घेण्यासंदर्भात इशाराही दिला होता. एवढंच नाही तर जहां नहीं चैना, वहां नहीं रहना असं म्हणत छगन भुजबळांनी सूचक इशाराही दिला होता. तसेच अजित पवार, सुनील तटकरे यांच्याबाबत नाराजी व्यक्त करत अप्रत्यक्ष टीका केली होती.**



दरम्यान, मध्यंतरी भुजबळांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट देखील घेतली होती. त्यामुळे छगन भुजबळांच्या मनात नेमकं काय चाललंय? असे प्रश्न अनेकांनी उपस्थित केले होते. दरम्यान, आज छगन भुजबळ त्यांच्या मतदारसंघाच्या दौऱ्यावर होते. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी सूचक विधान केलं. 'अनेकांचे पतंग कापले, पण माझा पतंग कुणीही कापलेला नाही', असं सूचक विधान छगन भुजबळ यांनी केलं. त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे."अनेकांचे पतंग कापले. आता आपल्या सहकाऱ्यांबरोबर पुन्हा पतंग उडवू", असं मिश्किल विधान छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना केलं. मात्र, भुजबळ यांच्या या विधानाला मंत्रिपद न मिळाल्याची किनार होती. याचवेळी माध्यमांच्या प्रतिनिधींनी भुजबळांना विचारलं की तुमचाही पतंग अडीच वर्षांसाठी कापला गेला आहे का? यावर उत्तर देताना भुजबळांनी म्हटलं की, "माझा पतंग कापलेला नाही. मी येवला मतदारसंघाचा पाचव्यांदा आमदार आहे. तुम्ही हे लक्षात घ्या की, माझा जन्म येवल्यात झालेला नाही. माझं घरदार किंवा कुटुंब येवल्यातील नाही. तरीही येवला आणि लासलगावच्या लोकांनी मला मागचे २० वर्ष आणि पुढच्या पाच वर्षांसाठी आमदारकी बहाल केलेली आहे", असं छगन भुजबळ यांनी म्हटलं. विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारने मोठं मताधिक्य मिळवत पुन्हा सत्ता स्थापन केली. महायुतीच्या या विजयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मोठा वाटा असल्याचं महायुतीचे नेते सांगतात. एवढंच नाही तर विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात महायुतीच्या नेत्यांनी पुन्हा आमचं असरकार आल्यास लाडक्या बहिणींच्या पैशात १५०० रुपयांवरून २१०० रुपयांपर्यंत वाढ करण्यात येणार असल्याची घोषणा केली होती. मात्र, महायुतीचं सरकार सत्तेत येऊन एक महिना होऊन गेला तरी याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. आता तर लाडकी बहीण योजनेसाठी काही निकष लावण्यात येणार असल्याची चर्चा आहे. अर्जाची छाननी करण्यात येणार असल्याचंही बोललं जात आहे. यातच काही दिवसांपूर्वी कृषीमंत्री कोकाटे यांनी एक मोठं विधान केलं होतं. लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यायचा की नमो शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ घ्यायचा? हे महिलांनी ठरवावं. कोणत्याही एकाच योजनेचा लाभ घेता येईल असं कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं होतं. दरम्यान, यानंतर आता राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे नेते तथा आमदार छगन भुजबळ यांनी लाडकी बहीण योजनेबाबत मोठं भाष्य केलं आहे. अपात्र महिलांनी अर्ज मागे न घेतल्यास दंडासह रक्कम वसुली करण्यात येईल, असा इशारा छगन भुजबळ यांनी दिला आहे. ते माध्यमांशी बोलत होते."योजनेचे नियम काही वेगळे असतात. आता एका घरात दोन महिलांना लाभ देता येत नाही. तसेच एखाद्याच्या घरी चारचाकी गाडी असेल तर त्यांना लाभ देता येणार नाही.

### छगन भुजबळ काय म्हणाले?

मात्र, गरीबांना लाभ मिळायला हवा. असा या योजनेचा उद्देश आहे. पण जे नियमात बसत नाहीत, त्यांनी स्वतःहून आपलं नाव काढून घेतलं पाहिजे. याबाबत लोकांना अवाहनही केलं पाहिजे. आता योजनेच्या माध्यमातून जे पैसे दिले गेले आहेत, ते पैसे परत मागण्यात काहीही अर्थ नाही. त्यामुळे दिले गेलेले पैसे पुन्हा घेण्यात येऊ नये. मात्र, यापुढे सांगितलं पाहिजे की, नियमात बसत नाही त्यांनी स्वत:हून आपले अर्ज काढून घ्यावीत. त्यानंतर जर त्यांनी आपले नावे काढून घेतले नाही, किंवा अपात्र महिलांनी अर्ज मागे न घेतल्यास दंडासह रक्कम वसुली कररण्यात येईल", असं इशारा छगन भुजबळ यांनी दिला आहे.कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना काही दिवसांपूर्वी एक प्रश्न विचारण्यात आला होता. नमो शेतकरी महासन्मान योजना आणि लाडकी बहीण योजना असा कोणता लाभ घेता येईल किंवा दोन्ही योजनेचा लाभ घेता येईल का? तेव्हा कोकाटे यांनी म्हटलं होतं की, "एका वेळी दोन योजनांचा लाभ घेता येत नाही. हा नियम आहे. त्यामुळे महिलांनी हा निर्णय घ्यायचा आहे.

---

# विधानसभेत भाजपाला मिळालेल्या यशाबद्दल आभार!

## श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र आपल्या भाजपात महत्वाचा आहे : देवेंद्र फडणवीस

**।कोल्हापूर।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज।**

**विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या घवघवीत यशानंतर आता भाजपाचं शिर्डीत महाविजय अधिवेशन पार पडत आहेत. या अधिवेशनासाठी राज्यातील भाजपाचे सर्व नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे देखील उपस्थित आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचं हे अधिवेशन महत्वाचं मानलं जात आहे.**



या अधिवेशनात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या यशाबद्दल सर्वांचे आभार मानले. तसेच महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. 'ज्यांना श्रद्धा आणि सबुरीचा अर्थ समजला नाही, त्यांची हालत काय झाली? हे विधानसभेला आपण पाहिलं', असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला."महाराष्ट्रामध्ये आपल्याला जो महाविजय प्राप्त झाला, त्याबद्दल आपल्या सर्वांना माझा साष्टांग दंडवत. कारण जनतेमुळे हा महाविजय मिळाला. आपल्या या लढाईमध्ये २४ तास आपल्याबरोबर अमित शाह होते. लोकसभेच्या निवडणुकीत मिळालेल्या अपयशानंतर कार्यकर्त्यांना लक्षात येत नव्हतं की आपलं काय चुकलं? मात्र, अशा परिस्थितीत अमित शाह यांनी विविध ठिकाणी मेळावे घेत आपल्याला मार्गदर्शन केलं, कार्यकर्त्यांच्या मनात ऊर्जा निर्माण केली. त्यानंतर भाजपाने महाविजय मिळवला. आज आपण शिर्डीत हे महाविजय अधिवेशन घेत आहोत याचा मला आनंद आहे", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं."साईबाबांनी आपल्याला श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र दिला. श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र आपल्या भाजपात महत्वाचा आहे. राष्ट्र प्रथम म्हणजे श्रद्धा आणि नंतर सबुरी म्हणजे आपण. हा मंत्र आपण सर्वजण पाळत असतो.

### भाजपाने 89 टक्के गुण मिळवले

पण श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र ज्यांना समजला नाही, त्यांची हालत काय झाली? हे आपण विधानसभेच्या निवडणुकीत पाहिलं", असं म्हणत देवेंद्र फडणवीसांनी विरोधकांवर टीका केली.महाराष्ट्राच्या जनतेने आपल्याला एक नाही तर तीन वेळा भाजपाला १०० पेक्षा जास्त जागा दिल्या. ३० वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासात १०० पेक्षा जास्त जागा मिळवणारा आपला पक्ष आहे. आपण पाहतो की जसं जी-२० असतं, जी-७ असतं. तसं भाजपाचं जी-६ तयार झालं, म्हणजे जे लगातार तीन वेळा जिंकले त्या राज्यांच्या म्हणजे गुजरात, मध्ये प्रदेश, गोवा, छत्तीसगड आणि हरियाणाबरोबर आता महाराष्ट्र देखील जुडलेला आहे. लोकसभेच्या निवडणुकीत ४८ पैकी १७ जागा आपल्या निवडून आल्या.

# 13 वर्षांच्या मुलीला साध्वी होण्यासाठी दान!

## दीक्षा देणाऱ्या महंताची जुन्या आखाड्याने केली हकालपट्टी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सोमवार (दि. १३ जानेवारी) पासून उत्तर प्रदेशमध्ये महाकुंभ मेळ्याची सुरुवात होत आहे. पण त्याआधीच 'जुना आखाडा' या सर्वात मोठ्या आखाड्याने एक मोठा निर्णय घेतला आहे. काही दिवसांपूर्वीच या आखाड्यात एका १३ वर्षांच्या मुलीला साध्वी बनण्याची दीक्षा देण्यात आली होती. हे नियमबाह्य असल्याचे सांगत आखाड्याने सदर महंत कौशल गिरी यांना ७ वर्षांसाठी बाहेर काढले आहे. तसेच साध्वी झालेल्या मुलीला तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात दिले आहे. तसेच त्यांना महाकुंभ मेळ्याच्या बाहेर जाण्यास सांगितले आहे. तसेच आखाड्याने बैठक घेऊन आता नियमावलीही तयार केली आहे. महिलांना जर संन्यासी व्हायचे असेल तर त्यांनी वयाची २२ वर्ष पूर्ण केलेली असावीत, नियम करण्यात आला आहे.**



कौशल गिरी यांनी सांगितले होते की, सदर मुलीच्या इच्छेनंतर तिच्या पालकांनीच तिला आखाड्याच्या स्वाधीन केले होते. मुलीने संन्यास घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर तिच्या पालकांची हरकत नव्हती. धर्मध्वज आणि पिंडदान सारख्या विधी झाल्यानंतर तिचा संन्यासी होण्याचा प्रवास सुरू होणार होता. मात्र या घटनेनंतर जुना आखाड्यातील ज्येष्ठ संतांनी चिंता व्यक्त केली. नैतिकता आणि कायद्याचे उल्लंघन झाल्याचा आरोप करून ज्येष्ठ संतांनी कौशल गिरी यांना बाहेरचा रस्ता दाखविण्याचा निर्णय घेतला. जुना आखाड्याचे प्रवक्ते नारायण गिरी म्हणाले की, सदर मुलगी अल्पवयीन असल्यामुळे तिचा संन्यासी होण्याचा निर्णय मान्य करता येणार नाही. त्यामुळेच तिला घरी परत पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढे २२ वयाहून कमी वय असलेल्या महिलांना संन्यासी केले जाणार नाही. हा निर्णय घेण्यासाठी सदर व्यक्तीमध्ये परिपक्वता येणे गरजेचे आहे. मुलांना आमच्या संकुलात प्रवेश दिला जाऊ शकत नाही. त्यामुळेच आम्ही यापुढे अशा घटना घडणार नाहीत, असे निर्देश दिले आहेत. टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या माहितीनुसार, सदर मुलीच्या वडिलांचे आग्रा येथे मिठाईचे दुकान आहे. २६ डिसेंबर रोजी वडील आपल्या दोन मुलींसह प्रयागराज येथे आले. कौशल गिरी यांच्या ओळखीने ते सेक्टर २० मधील जुना आखाड्याच्या संकुलात वास्तव्यास होते. या मुलीच्या नातेवाईकांनी सांगितले की, तीन वर्षांपूर्वी या कुटुंबाचा संपर्क कौशल गिरी यांच्याशी झाला. तेव्हापासून हे कुटुंब कौशल गिरी यांच्यावर श्रद्धा ठेवून आहे.प्रयागराजमध्ये १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत महाकुंभ मेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाकुंभ जगातील सर्वात मोठा धार्मिक कार्यक्रम आहे. या मेळाव्यासाठी जगभरातून भाविक येतात. यंदाचा मेळा नदीकाठच्या ४००० हेलटर क्षेत्रावर होणार आहे.

### महिलांना संन्यासी केले जाणार

त्यामुळेच तिला घरी परत पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढे २२ वयाहून कमी वय असलेल्या महिलांना संन्यासी केले जाणार नाही. हा निर्णय घेण्यासाठी सदर व्यक्तीमध्ये परिपक्वता येणे गरजेचे आहे. मुलांना आमच्या संकुलात प्रवेश दिला जाऊ शकत नाही. त्यामुळेच आम्ही यापुढे अशा घटना घडणार नाहीत, असे निर्देश दिले आहेत.टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या माहितीनुसार, सदर मुलीच्या वडिलांचे आग्रा येथे मिठाईचे दुकान आहे. २६ डिसेंबर रोजी वडील आपल्या दोन मुलींसह प्रयागराज येथे आले. कौशल गिरी यांच्या ओळखीने ते सेक्टर २० मधील जुना आखाड्याच्या संकुलात वास्तव्यास होते. या मुलीच्या नातेवाईकांनी सांगितले की, तीन वर्षांपूर्वी या कुटुंबाचा संपर्क कौशल गिरी यांच्याशी झाला. तेव्हापासून हे कुटुंब कौशल गिरी यांच्यावर श्रद्धा ठेवून आहे. प्रयागराजमध्ये १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत महाकुंभ मेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाकुंभ जगातील सर्वात मोठा धार्मिक कार्यक्रम आहे. या मेळाव्यासाठी जगभरातून भाविक येतात.

दर १२ वर्षांनी प्रयागराज मध्ये पूर्ण कुंभ मेळा आयोजित केला जातो, तसेच प्रयगराजमध्ये १४४ वर्षांनी आयोजित होणाऱ्या कुंभला महाकुंभ मेळा म्हणतात.

कौशल गिरी यांनी सांगितले होते की, सदर मुलीच्या इच्छेनंतर तिच्या पालकांनीच तिला आखाड्याच्या स्वाधीन केले होते. मुलीने संन्यास घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर तिच्या पालकांची हरकत नव्हती. धर्मध्वज आणि पिंडदान सारख्या विधी झाल्यानंतर तिचा संन्यासी होण्याचा प्रवास सुरू होणार होता. मात्र या घटनेंतर जुना आखाड्यातील ज्येष्ठ संतांनी चिंता व्यक्त केली. आरोप करून ज्येष्ठ संतांनी कौशल गिरी यांना बाहेरचा रस्ता दाखविण्याचा निर्णय घेतला. जुना आखाड्याचे प्रवक्ते नारायण गिरी म्हणाले की, सदर मुलगी अल्पवयीन असल्यामुळे तिचा संन्यासी होण्याचा निर्णय मान्य करता येणार नाही.

# सुरक्षित प्रवासासाठी केंद्राचा मोठा निर्णय!

## अपघातग्रस्तांची मदत : केंद्र सरकार देणार 25 हजार रुपये बक्षीस

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रस्त्यावर एखादा अपघात झाल्यास इतर वाहनचालक तो अपघात पाहूनही तिथे न थांबता आपल्या मार्गाने निघून जातात. बरेचजण आपला वेळ जाईल म्हणून तिथे थांबून अपघातग्रस्तांची मदत करत नाहीत. नाहीत. पोलीस आपल्याकडे चौकशी करत बसतील, त्याचा मनःस्ताप सहन करावा लागेल, पोलीस आपल्यालाच या अपघातात अडकवतील या भितीने लोक अपघातग्रस्तांची मदत करणं टाळतात.**

लोकांची ही सवय बदलण्यासाठी आणि त्यांना माणुसकी दाखवत अपघातग्रस्तांची मदत करायला प्रवृत्त करण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. कोणीही अपघातग्रस्तांची मदत केली तर केंद्र सरकार त्यांना आता २५ हजार रुपये बक्षीस म्हणून देणार आहे. देशात सुरक्षित प्रवासाला चालना मिळावी आणि अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळून त्यांचे प्राण वाचवता यावेत यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले,"रस्ते अपघातात जखमी झालेल्यांना तात्काळ



रुग्णालयात नेणाऱ्या लोकांसाठी सरकार बक्षिसाची रक्कम २५,००० रुपये करणार आहे. सध्या ही रक्कम पाच हजार रुपये इतकी आहे. म्हणजेच बक्षिसाची रक्कम पाच पटींनी वाढवली जाणार आहे".रस्ते सुरक्षेबाबत बॉलिवूड अभिनेते अनुपम खेर यांच्याबरोबर एका टीव्हीवरील कार्यक्रमात बोलताना गडकरी म्हणाले, "मी रस्ते वाहतूक मंत्रालयाला बक्षिसाची रक्कम

### नितीन गडकरी काय म्हणाले?

अशा स्थितीत ज्या व्यक्तीने पोलिसांना या अपघाताची माहिती दिलेली असते त्या व्यक्तीलाच साक्षीदार बनवण्याचा प्रयत्न केला जातो. रस्ते अपघातामधील पीडितांना मदत करणारे पोलिसांच्या कायदेशीर कार्यवाहीचा भाग बनतात. त्यात त्यांचा खूप वेळ जातो, तसेच त्यांना प्रचंड मनःस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे अनेकजण पोलिसांना अपघातांची माहिती देणं टाळतात. काही घटनांमध्ये अपघातग्रस्तांची मदत करणाऱ्या व्यक्तीला या अपघात प्रकरणात अडकवण्याची धमकी देऊन साक्षीदार बनवण्याचा प्रयत्न केला जातो.

वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. आत्ता देखील अशा प्रकारचं बक्षीस दिलं जात आहे. परंतु, त्या बक्षिसाची रक्कम खूप कमी आहे.अपघातग्रस्तांना रुग्णालयात नेणाऱ्या व्यक्तीला ५,००० रुपये बक्षीस म्हणून दिले जातात. मात्र मी बक्षिसाची रक्कम वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. रस्त्यावर कोणीही एखादा अपघात पाहिला तर एका तासाच्या आत अपघातग्रस्ताला रुग्णालयात नेणाऱ्या व्यक्तीला हे बक्षीस दिलं जाईल.

# ख्रिश्चन मुलीसोबत लग्न करतोय सुपरस्टार प्रभास?



मुंबई: 'बाहुबली' स्टार प्रभासच्या लग्नाची चर्चा याआधी अनेकदा रंगली आहे. याशिवाय विविध अभिनेत्रींसोबतही त्याचे नाव जोडले जाते. आता पुन्हा एकदा प्रभासच्या लग्नाची चर्चा सोशल मीडियावर पाहायला मिळाली. सोशल मीडियावर एक संभ्रमात टाकणारी पोस्ट व्हायरल झाली असून त्यानंतर सुपरस्टार प्रभासच्या लग्नाबद्दल बोलले जाते आहे. एका ट्रेड ॲनालिस्टने ही पोस्ट केली असून, यानंतर चाहत्यांच्या आनंदाला पारावार उरलेला नाही. अभिनेत्याच्या घरी लवकरच लगीनघाईला सुरुवात होणार का, असा सवाल उपस्थित होतो आहे. काहींने त्याचे नाव त्याची 'बाहुबली'मधील सहकलाकार अभिनेत्री अनुष्का शेट्टीसोबत जोडले आहे. सध्या प्रभास ४५ वर्षांचा आहे तर अनुष्का शेट्टी ४३ वर्षांची आहे. या दोघांनी एसएस राजामौली यांच्या 'बाहुबली' चित्रपटात एकत्र काम केले होते. तेव्हापासून त्यांच्या अफेअरचा अंदाज वर्तवला जात होता. मात्र आतापर्यंत एकदाही अनुष्का किंवा प्रभासने या नात्याबद्दलच्या अफवांना दुजोरा दिलेला नाही. विजयबालन यांनी एक्स या प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये त्याने फक्त प्रभासचे नाव लिहिले असून, त्यापुढे एक वधूची इमोजी वापरली आहे. त्यांनी वापरलेली इमोजी ही एका ख्रिश्चन वधूची आहे. ही पोस्ट काही वेळातच व्हायरल झाली आणि अभिनेत्याच्या लग्नाची चर्चा सुरू झाली आहे.

# कोणीच पाठिंबा न दिल्याने कंगना भडकली

लोकसभा निवडणुकीत हिमाचल प्रदेशमधील मंडी मतदारसंघातून विजयी झालेल्या नवनिर्वाचित खासदार व अभिनेत्री कंगना रणौत यांना चंदीगढ विमानतळावर एका महिला सुरक्षारक्षकाना थोबाडीत लगावली. मारहाण सीआयएसएफ महिला सुरक्षारक्षक कुलविंदर कौरला निलंबित करण्यात आलं आहे. मारहाण झाल्याप्रकरणी सिनेइंडस्ट्रीतील कोणीही प्रतिक्रिया दिलेली नाही, यावर कंगना यांनी नाराजी व्यक्त करत सेलिब्रिटींनी सुनावलं आहे. कंगना रणौत यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी बॉलीवूडमधील सेलिब्रिटींनी कोणतीच प्रतिक्रिया दिलेली नाही. काही दिवसांपूर्वी 'ऑल आईज ऑन राफाह' ही पोस्ट अनेकांनी शेअर केली होती. त्या पोस्टचा उल्लेख करत कंगना यांनी सेलिब्रिटींवर टीका केली आहे. त्यांनी इन्स्टाग्रामवर केलेली पहिली पोस्ट डिलीट केली आणि नंतर दुसरी पोस्ट केली. त्यांच्या या दोन्ही पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.कंगना यांनी पहिल्या पोस्टमध्ये लिहिलं होतं, पूर्ण मौन बाळगून आहात. पण लक्षात ठेवा, उद्या तुम्ही आपल्या देशात किंवा जगात कुठेही रस्त्यावर फिरत असाल, तेव्हा काही इस्रायली/पॅलेस्टिनी तुमच्यावर किंवा तुमच्या मुलावर हल्ला करतील, तेही फक्त याचसाठी की तुम्ही सर्वजण राफाहच्या समर्थनार्थ उभे होता होतात, त्यावेळी तुम्ही पाहाल की मी तुमच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी लढेन... जर एखाद्या दिवशी तुम्हाला वाटेल मी का आणि मी कुठे आहे, तर लक्षात ठेवा तुम्ही मी नाहीत.

# शरयू आणि पूर्वा पुन्हा एकदा थिरकल्या


'पारू' या मालिकेने अगदी थोड्या वेळातंच प्रेक्षकांचं मन जिंकलं. पारूची भूमिका साकारणारी शरयू सोनावणे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलीय. शरयू सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. चाहत्यांबरोबर संपर्कात राहण्यासाठी शरयू मालिकेच्या सेटवरील धमाल मस्ती सोशल मीडियाद्वारे शेअर करत असते.या मालिकेत दिशा हे खलनायिकेचं पात्र साकारणारी पूर्वा शिंदेबरोबर शरयू अनेकदा डान्स रील्स बनवत असते. अलीकडेच "ए कंचन" या ट्रेंडिंग गाण्यावर दोघी थिरकल्या होत्या. तर दोघींनी प्रसादबरोबर 'पुष्पा-२'च्या "अंगारो सा" या गाण्यावरदेखील हूकस्टेप करत डान्स केला होता. तो अजूनही सोशल मीडियावर व्हायरल होतोय. पुष्पा चित्रपटातील 'अंगारो' हे गाण नुकतंच प्रदर्शित झालं. या गाण्याच्या हूकस्टेपने सध्या प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलंय. गाण रीलिज झाल्यानंतर अनेक कलाकारांनी ही हूकस्टेप करत सोशल मीडियावर रिल्स शेअर करायला सुरुवात केलीय.अशातच दोघी पुन्हा एकदा याच गाण्यावर थिरकल्या आहेत. या डान्सचा व्हिडीओ पूर्वाने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केला आहे. हे गाणं रीलिज झाल्यापासून ट्रेंडिंग आहे. सोशल मीडिया इंफ्लूएन्सर्स ते कलाकार या गाण्यावर थिरकताना दिसतायत. दोघींचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होताना दिसतोय. अगदी काही वेळातच या व्हिडीओला तीन हजारांपेक्षा जास्त व्ह्यूज मिळाले आहेत. दोघींच्या मनमोहक अदांनी चाहत्यांना भुरळ पाडली आहे. शरयू आणि पूर्वाचा हा डान्स व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय.



# वय न लपवण्याबद्दल समीरा म्हणाली

बॉलीवूड अभिनेत्री समीरा रेड्डी हिने सिनेइंडस्ट्रीतील तिचे अनुभव सांगितले आहेत. करिअरमध्ये यशाच्या शिखरावर असताना तिच्या शरीरात बदल करण्यासाठी इंडस्ट्रीकडून आलेल्या दबावाबद्दल तिने भाष्य केलं. तिला अनेक प्रसंगी अनेक फिल्टर्स लावण्यास सांगितलं गेलं, पण या दबावाला न जुमानता आपण काम केलं असं समीराने नमूद केलं. 'हिंदुस्तान टाईम्स'ला दिलेल्या मुलाखतीत समीरा म्हणाली, "माझ्या करिअरमध्ये यशाच्या शिखरावर असताना मी सर्जरी करून माझे स्तन मोठे करून घ्यावे, यासाठी माझ्यावर किती दबाव टाकला गेला हे मी सांगू शकत नाही. बरेच लोक म्हणायचे, 'समीरा, सगळे करत आहेत, मग तू का नाही?' पण मला माझ्या आत असं काही नको होतं. हे आपले असे दोष लपवण्यासारखं झालं जे मुळात दोष नाहीच. ज्यांना प्लास्टिक सर्जरी आणि बोटॉक्स करायचं आहे त्यांना मी नावं ठेवणार नाही, पण मी ते करणार नाही."समीरा बऱ्याचदा आपलं वय जाहीरपणे सांगते आणि यासाठी चाहते तिचं कौतुकही करतात. गुगलने समीराचं वय चुकीचं दिलं होतं, पण तिने ते दुरुस्त करून घेतल्याचं सांगितलं. "लोक म्हणतात की मी आता अधिक आनंदी आणि अधिक कंफर्टेबल दिसत आहे. मी २८ वर्षांची असताना सुंदर दिसत होते, पण ४५ व्या वर्षी एक कंफर्ट आला आहे. मी ४० वर्षांची असताना इंटरनेट माझं वय ३८ वर्षे दाखवत होतं. पण मला ४० वर्षांची असल्याचा अभिमान होता म्हणून मी लगेचच ते बदलून घेतलं," असं समीरा म्हणाली.सुरुवातीला समीरा जेव्हा सोशल मीडियावर आली, तेव्हा तिला अनेकांनी फिल्टर वापरण्याचा सल्ला दिला होता. "मी म्हणाले की मी माझी त्वचा खराब असेल तर मी ती तशीच दाखवेन, मी माझं वाढलेलं वजन दाखवेन. कारण हीच मी आहे. ३६-२४-३६ या बॉडी साइजमध्ये फिट होण्याचा प्रयत्न करण्याऐवजी मी जे केलं, त्याबद्दल जास्त आनंदी आहे. मी खऱ्या आयुष्यात जशी आहे, तशीच मी सोशल मीडियावर वावरले. चित्रपटांमध्ये काम करताना मी हे कधीच करू शकले नव्हते."समीरा पुढे म्हणाली, "माझ्या आणि माझ्या प्रेक्षकांमध्ये नेहमीच एक पडदा होता. लोकांना जे ऐकायचं आहे

# ट्विंकलने अनेक पुस्तकं लिहिली



एकेकाळची लोकप्रिय अभिनेत्री व प्रसिद्ध लेखिका ट्विंकल खन्ना हिने आता तिच्या आयुष्यातील एक मनोरंजक किस्सा सांगितला आहे. हा किस्सा तिची मुलगी निताराशी संबंधित आहे. मुलगी निताराच्या रंगावर एका नातेवाईकाने टिप्पणी केली होती, असं ट्विंकलने तिच्या ब्लॉगमध्ये सांगितलं आहे. नातेवाईकाच्या त्या टिप्पणीनंतर निताराला पोहणं शिकायचं नव्हतं आणि अचानक तिला भाऊ आरवसारखं गोरं दिसायचं होतं, असं ट्विंकल म्हणाली. 'द टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये लिहिलेल्या ब्लॉगमध्ये ट्विंकल म्हणाली, "एक वेळ अशी होती जेव्हा माझ्या लहान मुलीला पोहणं शिकणं थांबवायचं होतं. कारण तिची त्वचा काळवंडली होती. 'मला दादासारखाच रंग हवा आहे.' असं ती म्हणत होती. त्यामागचं कारण म्हणजे एका मूर्ख नातेवाईकाने केलेली टिप्पणी तिने ऐकली होती. 'ती खूप गोंडस आहे पण तिच्या भावासारखी गोरी नाही,' असं त्या नातेवाईकाने म्हटलं होतं."या प्रसंगानंतर आपण मुलीला फ्रिडा काहलोचं यांचं आत्मचरित्र वाचायला दिलं, असं ट्विंकलने सांगितलं. फ्रिडा या खूप गोऱ्या नव्हत्या, त्यांच्या दोन्ही भुवया आपसात जोडलेल्या होत्या, पण त्या प्रचंड हुशार होत्या. या पुस्तकामुळे चिमुकल्या निताराचे दिसण्याविषयीचे, रंगाविषयीचे तिचे विचार बदलले. आता ती म्हणते की तिला भावाइतकं सनब्लॉकर वापरावं लागत नाही, कारण तो गोरा आहे, त्यामुळे त्याला त्याच्या त्वचेची जास्त काळजी घ्यावी लागते. पांढरा रंग लवकर घाण होतो, पण तपकिरी व गडद रंग लवकर घाण होत नाहीत, असं नितारा म्हणते. ट्विंकलने सांगितलं की तिला वाचनाची सवय तिचे वडील राजेश खन्ना यांनी लावली होती. तेही खूप पुस्तकं वाचायचे. माझ्या मुलीला पुस्तकं वाचायला शिकवणं सोपं नव्हतं. ट्विंकलने तिला पुस्तक वाचण्याची सवय लावण्यासाठी एक मनोरंजक उपाय शोधला. ट्विंकल निताराबरोबर पुस्तक वाचण्याची स्पर्धा करते. जेव्हा ट्विंकल म्हणते की ती पुस्तक वाचण्यात पुढे आहे, तेव्हा नितारा आणखी वेगाने वाचू लागते.२००१ मध्ये अक्षय कुमारसोबत लग्न केल्यानंतर ट्विंकल खन्नाने अभिनय सोडला कारण तिला अभिनय करून आनंद मिळत नव्हता. तिला पुस्तकांची खूप आवड आहे आणि तिने अभिनय सोडल्यावर याच क्षेत्रात करिअर केलं. ट्विंकलने 'वेलकम टू पॅराडाईज' आणि 'पायजामा फॉरगिव्हिंग' यासह अनेक पुस्तकं लिहिली आहेत.

# जेमिमाने सात वर्षांनी झळकावलं शतक!

## रॉड्रिग्जच्या शतकाच्या जोरावर भारताने घडवला इतिहास

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय महिला क्रिकेट संघाने राजकोटमध्ये जेमिमा रॉड्रिग्ज पहिल्यावहिल्या शतकाच्या जोरावर इतिहास घडवला आहे. आयर्लंडविरुद्धच्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारताने ५० षटकांत ५ गडी गमावून ३७० धावांचा डोंगर उभारला. महिला वनडेमधली ही भारताची सर्वोच्च धावसंख्या आहे. यापूर्वी २०१७ मध्ये भारताने बडोद्यात आयर्लंडविरुद्ध दोन विकेट गमावून ३५८ धावा केल्या होत्या.**



महिलांच्या एकदिवसीय सामन्यातील ही एकूण १५ वी सर्वोच्च धावसंख्या आहे. महिलांच्या एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम न्यूझीलंडच्या नावावर आहे. न्यूझीलंडने २०१८ मध्ये डब्लिनमध्ये आयर्लंडविरुद्ध चार विकेट गमावून ४९१ धावा केल्या होत्या. महिलांच्या एकदिवसीय सामन्यातील पहिल्या चार सर्वोच्च धावा न्यूझीलंड महिला संघाच्या नावावर आहेत.कर्णधार स्मृती मानधनाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मानधना आणि प्रतिका यांनी पुन्हा एकदा टीम इंडियाला चांगली सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी १५६ धावांची भागीदारी केली. मानधनाने ५४ चेंडूत १० चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ७३ धावा केल्या तर प्रतिकाने ६१ चेंडूत आठ चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने ६७ धावांची स्फोटक खेळी केली. यानंतर हरलीन देओलनेही अर्धशतक झळकावले. तिने ८४ चेंडूत १२ चौकारांच्या मदतीने ८९ धावा केल्या.यानंतर स्टार फलंदाज जेमिमा रॉड्रिग्जने शतकी खेळी साकारली. तिने ९१ चेंडूंचा सामना करताना ११२.०८ च्या स्ट्राइक रेटने १०२ धावा केल्या. यादरम्यान जेमिमा रॉड्रिग्जने १२ चौकार मारले. जेमिमा रॉड्रिग्सच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हे पहिले शतक आहे. तिने फेब्रुवारी २०१८ मध्ये आपल्या आंतरराष्ट्रीय करिअरची सुरुवात टी-२० सामन्याने केली होती. यानंतर, तिने १२ मार्च २०१८ रोजी एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. म्हणजेच जेमिमा रॉड्रिग्जला तिचं पहिलं शतक झळकावायला जवळपास ७ वर्षे लागली.जेमिमाह रॉड्रिग्जच्या या खेळीमुळे टीम इंडियाने ५० षटकांत ५ विकेट्स गमावून ३७० धावांचा डोंगर उभारला केल्या. एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतीय महिला संघाची आतापर्यंतची ही सर्वात मोठी धावसंख्या आहे. स्मृती मंधाना आणि प्रतिक रावलने पहिल्या विकेटसाठी १५६ धावांची भागीदारीही केली. ऋचा घोष पाच चेंडूत १० धावा करून बाद झाली. तेजल हसबनीस आणि सायली सातघरे प्रत्येकी दोन धावा करून नाबाद राहिल्या. आयर्लंडकडून ओरला प्रेंडरगास्ट आणि आर्लेन केलीने प्रत्येकी दोन गडी बाद केले. जॉर्जिना डेम्पसीला एक विकेट मिळाली.महिलांच्या एकदिवसीय सामन्यातील ही एकूण १५ वी सर्वोच्च धावसंख्या आहे. महिलांच्या एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम न्यूझीलंडच्या नावावर आहे. न्यूझीलंडने २०१८ मध्ये डब्लिनमध्ये आयर्लंडविरुद्ध चार विकेट गमावून ४९१ धावा केल्या होत्या. महिलांच्या एकदिवसीय सामन्यातील पहिल्या चार सर्वोच्च धावा न्यूझीलंड महिला संघाच्या नावावर आहेत.कर्णधार स्मृती मानधनाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मानधना आणि प्रतिका यांनी पुन्हा एकदा टीम इंडियाला चांगली सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी १५६ धावांची भागीदारी केली.

### इंडियाने 370 धावांचा डोंगर उभारला

मानधनाने ५४ चेंडूत १० चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ७३ धावा केल्या तर प्रतिकाने ६१ चेंडूत आठ चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने ६७ धावांची स्फोटक खेळी केली. यानंतर हरलीन देओलनेही अर्धशतक झळकावले. तिने ८४ चेंडूत १२ चौकारांच्या मदतीने ८९ धावा केल्या.यानंतर स्टार फलंदाज जेमिमा रॉड्रिग्जने शतकी खेळी साकारली. तिने ९१ चेंडूंचा सामना करताना ११२.०८ च्या स्ट्राइक रेटने १०२ धावा केल्या. यादरम्यान जेमिमा रॉड्रिग्जने १२ चौकार मारले. जेमिमा रॉड्रिग्सच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हे पहिले शतक आहे. तिने फेब्रुवारी २०१८ मध्ये आपल्या आंतरराष्ट्रीय करिअरची सुरुवात टी-२० सामन्याने केली होती. यानंतर, तिने १२ मार्च २०१८ रोजी एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. म्हणजेच जेमिमा रॉड्रिग्जला तिचं पहिलं शतक झळकावायला जवळपास ७ वर्षे लागली.जेमिमाह रॉड्रिग्जच्या या खेळीमुळे टीम इंडियाने ५० षटकांत ५ विकेट्स गमावून ३७० धावांचा डोंगर उभारला केल्या.

# रोहित मेलबर्न कसोटीनंतर घेणार होता निवृत्ती

## एका हितचिंतकाच्या सांगण्यावरून बदलला निर्णय

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलिया दौऱ्यात रविचंद्रन अश्विनने निवृत्तीची घोषणा करून सर्वांनाच आश्चर्यचकित केले होते. मालिकेच्या अखेरीस आणखी एक खेळाडू निवृत्ती घेणार असल्याच्या चर्चा होत्या, पण तसे झाले नाही. मात्र आता त्या खेळाडूचे नाव समोर आले आहे. तो खेळाडू दुसरा कोणी नसून कर्णधार रोहित शर्मा होता.**



होय, मेलबर्नमध्ये खेळल्या गेलेल्या बॉक्सिंग डे कसोटीनंतर रोहित शर्मा कसोटी क्रिकेटला अलविदा करणार होता, पण त्याच्या एका हितचिंतकाच्या सांगण्यावरून त्याने आपला निर्णय बदलला आणि निवृत्ती घेतली नाही. हिटमॅनच्या निवृत्ती न घेण्याच्या निर्णयावर गौतम गंभीर नाराज असल्याचे सांगण्यात येत आहे.दुसऱ्या मुलाच्या जन्मामुळे रोहित शर्मा मालिकेतील पहिला सामना खेळू शकला नाही. अॅडलेड कसोटीत परतल्यावर तो मधल्या फळीत खेळला. कारण केएल राहुलने पर्थमध्ये डावाची सुरुवात करताना चांगली कामगिरी केली होती. अॅडलेड आणि गाबा या दोन्ही सामन्यांमध्ये रोहित फ्लॉप ठरला. शेवटी, त्याने एक कठीण निर्णय घेतला आणि सलामीला उतरला. त्याच्या या निर्णयामुळे शुबमन गिलला बाहेर बसावे लागले आणि केएल राहुल तिसऱ्या क्रमांकावर उतरला. रोहितची ही युक्तीही कामी आली नाही आणि मेलबर्नमध्येही तो अपयशी ठरला. याच निराशेमुळे रोहित शर्माने निवृत्तीचा घेण्याचा निर्धार केला होता.टाईम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, रविचंद्रन अश्विननंतर निवृत्त होणारा भारतीय कर्णधार हा दुसरा खेळाडू असू शकला असता, परंतु त्याच्या जवळच्या काही लोकांच्या विनंतीवरून कर्णधाराने आपला निर्णय बदलला. या परिस्थितीची माहिती असलेल्या एका सूत्राने सांगितले की, “रोहितने मेलबर्न कसोटीनंतर निवृत्ती घेण्याचे मन बनवले होते.

### अनेक मुद्द्यांवर दोघांमध्ये मतभेद

जर बाहेरून त्याच्या हितचिंतकांनी त्याला त्याचे मत बदलण्यास भाग पाडले नसते, तर ऑस्ट्रेलियात आपण आणखी एका निवृत्ती घेताना पाहू शकलो असतो.”रोहित शर्माचे निवृत्तीबद्दल मन बदलल्याने मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर नाराज झाले होते, अशी चर्चा होती. त्यानंतर रोहित सिडनी झालेलल्या कसोटीत खेळला नाही. खरं तर, संघ संयोजन, नाणेफेक आणि इतर अनेक मुद्द्यांवर दोघांमध्ये मतभेद होते. गंभीर आणि रोहित या दोघांवरही खराब प्रदर्शनानंतर चांगली कामगिरी करण्याचा दबाव आहे.